**नियमीत दरखास्त क्र.१०४/२०१८ मध्ये निशाणी ४८, ५१ व ६४ खाली आदेश**

(तृप्ती विधाते वि. महेश नवले)

निशाणी ४८ अन्वयेच्या अर्जानुसार दरखास्तदाराने दिनांक २८/०७/२०१८ ते २७/०२/२०२० या कालावधीतील पोटगी रक्कम रुपये १,८१,०३४/-, निशाणी ५१ अन्वयेच्या अर्जानुसार दिनांक २७/०२/२०२० ते २७/०७/२०२१ या कालावधीची पोटगी रक्कम रुपये १,५३,०००/- अधिक वकील फी रुपये १५,०००/- व खर्च रुपये ५००/- अशी एकूण १,६८,५००/- रुपये व निशाणी ६४ अन्वयेच्या अर्जानुसार दिनांक २७/०७/२०२१ ते २७/०७/२०२२ या कालावधीची पोटगी रक्कम रुपये १,०८,०००/- व खर्च रुपये १५,०००/- अशी एकूण १,२३,०००/- रुपये ऋणकोकडून वसुल होऊन मिळावे, अशी मागणी केली आहे.

२) ऋणकोतर्फे निशाणी ५४ अन्वये निशाणी ४८ च्या अर्जास जबाब देऊन असे कथन केले आहे की, निशाणी १ वर नमुद संपूर्ण रक्कम अर्जदारास दिलेली असून तिला सदर अर्ज देण्याचा अधिकार नाही. ऋणको व त्याच्या मिळकती या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेरील असल्यामुळे सदरची दरखास्त चालवण्याचा अधिकार या न्यायालयास नाही. त्यामुळे निशाणी ४८ व ५१ अन्वयेचे अर्ज नामंजूर करण्यात यावेत. निशाणी ६४ वर ऋणकोच्या विधीज्ञांनी जबाब देऊन असे नमुद केले आहे की, निशाणी १ मधील सर्व रक्कम भरलेली आहे त्यामुळे सदरचा अर्ज चालण्याजोगा नाही व अर्ज नामंजूर व्हावा.

३) अर्ज व त्यावरील जबाब वाचले. दोन्ही पक्षांतर्फे युक्तिवाद ऐकला.

धनकोतर्फे दाखल निशाणी ६९ अन्वयेच्या लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले. धनकोतर्फे त्यांच्या युक्तिवादाच्या पुष्टयर्थ **स्वाती सुरेश उबाळे वि. सुरेश लक्ष्मण उबाळे**, फौजदारी अर्ज क्र. ११२/१९९५, दिनांक ०४/०९/१९९५ या मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिनिर्णयाचा आधार घेतला आहे.

४) ऋणकोतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, दरखास्तीमध्ये हिंदू विवाह कायदा, कलम २५ प्रमाणे मागणी आहे असे नमुद केले नाही. सदर कलम २५ प्रमाणे विशिष्ट तरतुद आहे. हातातील दरखास्त सदर तरतुदीखाली येत नाही व त्याकरीता स्वतंत्र हुकूमनामा लागेल. घटस्फोटाच्या हुकूमनाम्यामध्ये सदर कलम २५ प्रमाणे हुकूमनाम्यात कायम पोटगीचे आदेश नाहीत. तसेच सदर कलमानुसार मुलाला पोटगी देण्याचे प्रावधान नाही. विशेष विभागीय अधिकारी हे मंगळवेढा तालुक्यातील आहेत. ते गारनिशी असले तरी या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील नाहीत. ऋणको व त्याच्या मिळकती या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात नाहीत. सांगोला न्यायालयाला दरखास्त पुर्ततेचे अधिकार आहेत व या न्यायालयाला नाहीत. त्यामुळे दरखास्त हस्तांतरीत करावी लागेल. निशाणी १८ अन्वयेचा अर्ज हा विशेष विभागीय अधिकारी यांच्याकडे रक्कम अटॅच करुन मिळावी म्हणून दाखल केला होता. सदर अर्ज या न्यायालयास अधिकार क्षेत्र नाही म्हणून नामंजूर करण्यात आला आहे. हुकूमनाम्यामध्ये ऋणकोचे वडील सुखदेव पक्षकार नाही. संपादीत झालेली जमीन वडिलोपार्जीत आहे, असे धनकोने शाबीत केले नाही. सदर मिळकत सुखदेवची स्वतंत्र मिळकत आहे. तसेच ऋणकोला चार बहिणी आहेत. त्यांचा देखील त्यात हिस्सा आहे. निशाणी ४८ अन्वये कोणत्या मिळकती जप्त करायचा हे अर्जात नमुद नाही. विशेष विभागीय अधिकारी हे गारनिशी असतील तर मिळकत ऋणकोच्या नांवची असणे गरजेची आहे. किती रकमेचे

अटॅचमेंट वॉरंट काढावे, हे अर्जात नमुद केले नाही. शेवटी अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

५) दरखास्तदाराने सदरची दरखास्त हिंदू विवाह अर्ज क्र.२५१/२०१६ मधील दिनांक २७/०६/२०१८ रोजीच्या हुकूमनाम्यानुसार पोटगीची रक्कम वसुल होऊन मिळणेकरीता दाखल केली आहे. सदर हुकूमनाम्यानुसार अर्जदार/दरखास्तदार तृप्ती सुरेंद्र विधाते/तृप्ती महेश नवले हिस दरमहा ६,०००/– रुपये व तिचा मुलगा अर्जदार क्र.२ यास दरमहा रक्कम रुपये ३,०००/– तो सज्ञान होईपावेतो पोटगी द्यावी, असा आदेश सामनेवाला महेश सुखदेव नवले यांच्या विरुध्द करण्यात आलेला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ऋणको याने आज पावेतो रक्कम रुपये १,८०,०००/– धनको हिस पोटगीची थकबाकी म्हणून दिली असल्याचे दप्तरावरुन दिसून येते. हातातील अर्जानुसारची थकबाकी ऋणको याने धनको हिस अद्याप दिलेली नाही असे अभिलेखावरुन दिसून येते. निशाणी ५९ अन्वयेच्या दिनांक १५/०२/२०२३ रोजीच्या आदेशानुसार हातातील अर्ज व त्यातील मागणी ही कायदेशीर असल्याचे या न्यायालयाने गृहीत धरलेले आहे. तसेच ऋणकोतर्फे करण्यात आलेला युक्तिवाद म्हणजे हिंदू विवाह कायदा, कलम २५ प्रमाणे सदरची दरखास्त नाही, किंवा मुलाला सदर कलम २५ प्रमाणे पोटगी देता येणार नाही, हा युक्तिवाद प्रकरणाच्या या स्टेजला गृहीत धरता येणार नाही कारण मुळ पिटीशन मंजूर होऊन सक्षम न्यायालयाने धनको व तिच्या मुलाला पोटगी मंजूर केलेली आहे व सदर हुकूमनाम्याचे अंमलबजावणी म्हणून सदरची दरखास्त दाखल केलेली आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये असे गृहीत धरले आहे की, सदर कायद्याच्या कलम २४ व २५ प्रमाणे मुलांना पोटगीचे आदेश न्यायालय करु शकते.

६) निशाणी ५१ अन्वयेच्या अर्जानुसार धनकोने भूसंपादन मोबदला रकमेतून संबंधित बँक/ भूसंपादन अधिकारी, मंगळवेढा यांचेकडून रक्कम पोटगीच्या थकबाकीच्या वसुली कामी कोर्टात जमा करुन घ्यावी तसेच ऋणकोच्या मालकी वहिवाटीच्या दरखास्तीमध्ये नमुद केलेल्या स्थावर व जंगम मिळकती जप्ती विक्री करण्यात यावा, अशा व इतर दादी मागितल्या आहेत. ऋणको व दरखास्तीत नमुद जप्त करावयाची मिळकत ही सांगोला तालुक्यामध्ये आहे, त्यामुळे त्याबाबत जप्तीचे आदेश देण्याचे अधिकार क्षेत्र या न्यायालयास येत नाही. त्यामुळे केवळ भूसंपादन अधिकारी यांना आदेश देता येतील किंवा कसे, हे पाहणे गरजेचे आहे.

७) ऋणकोतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सुखदेव नवले हे ऋणकोचे वडील असून त्यांच्या नांवाने भूसंपादन मोबदला मिळालेला आहे व जी मिळकत संपादीत झाली आहे ती श्री. सुखदेव नवले यांची स्वकष्टार्जीत मिळकत आहे. सदरच्या युक्तिवादाच्या पुष्टयर्थ म्हणजे, संपादीत झालेली मिळकत ही सुखदेव नवले यांची स्वकष्टार्जीत मिळकत आहे हे दाखविण्याकरीता ऋणकोतर्फे कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. या उलट निशाणी २५ अन्वयेच्या जबाबामध्ये सुखदेव नवले यांनी असे नमुद केले आहे की, *'रक्कम रुपये दोन लाखासाठी संपूर्ण संपादनाचा मोबदला न्यायालयात हजर करण्याचे आदेश होणे कायदेशीर नाही. या उपरही यातील धनकोचे मुळ दरखास्त ही रक्कम रुपये १,८०,०००/– चीच आहे. त्यामुळे त्या रकमेपोटी फक्त ती रक्कम जप्त करुन न्यायालयात एफ.डी. म्हणून अर्जाच्या शेवटपर्यंत निर्णय होईपर्यंत ठेवण्यात यावी व उर्वरीत त्रयस्थाचे गट नं.४५१ मधील हिस्सेदारांची रक्कम देण्याचे त्वरीत आदेश न्यायालयाने केल्यास त्रयस्थाची कसलीही हरकत राहणार नाही.'* तसेच भूसंपादन अधिकारी, मंगळवेढा यांनी निशाणी ३४ अन्वयेच्या त्याच्या

जबाबामध्ये असे नमुद केले आहे की, *'दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम ४६अ च्या तरतुदीचा विचार करता केवळ थकबाकी पुरती रक्कम मागणी करता येईल त्यापेक्षा जास्त रकमेची मागणी करण्याचा अधिकार दरखास्तदार यांना नाही.'* तसेच सदर अर्जांच्या जबाबामध्ये ऋणकोने असे कथन केले आहे की, ऋणकोला चार बहिणी आहेत व त्यांचा देखील भूसंपादनाच्या रकमेमध्ये हिस्सा आहे. याचाच अर्थ असा की, ऋणकोचा देखील सदर रकमेमध्ये हिस्सा आहे.

८) मा. सर्वोच्च न्यायालयाने **राहुल शहा वि. जितेंद्रकुमार गांधी व इतर**, दिवाणी अपील क्र. १६६१-१६६२/२०२१ (एसएलपी क्र.११८५९-११८६०/२०२०) सह दिवाणी अपील क्र. १६६३-१६६४/२०२१ (एसएलपी क्र.११७९२-११७९३/२०२०) या अधिनिर्णयामध्ये खालील प्रमाणे आदेशीत केले आहे.

> '*under Sec.60 of CPC the term "....... in the name of the judgment debtor or by another person in trust for him or on his behalf" should be read liberally to incorporate any other person from whom he may have the ability to derive share, profit or property.*'

९) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार श्री. सुखदेव नवले यांना मिळणाऱ्या संपादनाच्या रकमेमध्ये ऋणको याचा हिस्सा असल्यामुळे पोटगीच्या थकबाकीची रक्कम या न्यायालयात जमा करण्याचे आदेश मा. भूसंपादन अधिकारी, मंगळवेढा यांना देता येतील. सदर आदेश दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २१ नियम ४६ प्रमाणे देखील करता येतील. दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २१ नियम ४८ प्रमाणे ऋणको किंवा त्याला पगार देणारा मालक न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात नसेल तरी देखील कायद्या प्रमाणे त्याच्या पगारातील रक्कम जप्त करुन धनकोला देण्याचे आदेश

देता येतात. भूसंपादन अधिकारी हे देखील पैशाच्या स्वरुपात नुकसान भरपाई देणार असल्यामुळे थकबाकीपोटी रक्कम सुखदेव नवले यांना न देता, ती न्यायालयात जमा करण्याची विनंती भूसंपादन अधिकारी यांना करता येईल.

१०) निशाणी ५१ व ६४ अन्वयेच्या अर्जात धनको हिने वकील फी व खर्च असे प्रत्येकी रुपये १५,०००/– मागणी केली आहे, परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखात दाखल केलेला नाही. त्यामुळे त्याबाबत आदेश देता येणार नाही. निशाणी ४२ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार श्री. सुखदेव नवले यांना भूसंपादन नुकसान भरपाई म्हणून रुपये ४७,०२,४०४/– इतकी रक्कम मिळणार आहे. हातातील अर्जानुसार ऋणकोकडे एकूण थकबाकी रक्कम रुपये ४,४२,०३४/– इतकी बाकी आहे. धनकोचा मुलगा हा अज्ञान असून तो शिक्षण घेत आहे. सद्यपरिस्थितीत शैक्षणिक फी व धनको व तिच्या मुलाचा उदरनिर्वाहाचा विचार करता, ऋणकोने सदर रक्कम त्वरीत तिला देणे गरजेचे होते, परंतु ऋणकोने पोटगीची रक्कम सन २०१८ पासून थकित ठेवली आहे. या व उपरोक्त सर्व विश्लेषणानुसार धनकोचा निशाणी ४८, ५१ व ६४ वरील अर्ज अंशतः मंजूर करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येतात.

## – आदेश –

१. निशाणी ४८, ५१ व ६४ वरील अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतात.

२. मा. सक्षम प्राधिकारी भूसंपादन तथा उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा, यांना अशी विनंती करण्यात येते की, सुखदेव मारुती नवले यांना सांगोला येथील गट नं.४५१ पैकी संपादीत मिळकती संदर्भात मिळणाऱ्या मोबदल्याच्या रक्कम रुपये

४७,०२,४०४/– पैकी रक्कम रुपये ४,४२,०३४/– एवढी रक्कम त्यांना न देता श्रीमती तृप्ती महेश नवले उर्फ तृप्ती सुरेंद्र विधाते यांनी दाखल केलेल्या दरखास्त क्र. १०४/२०१८ मधील पोटगीच्या थकबाकीच्या वसुली कामी या न्यायालयात त्वरीत जमा करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by REVATI MALLIKARJUN KANTE
Date: 2023.09.01 17:28:00 +0530

दिनांक – ०१/०९/२०२३

( **रेवती म. कंटे** )
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
बार्शी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | R.P. Sakinal, Steno. Grade-2 |
| b) | Court | : | Jt. CJSD and ACJM Court, Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 01.09.2023 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 01.09.2023 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 01.09.2023 |